# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः09.12.2024** **वारःसोमवार**

---

1. राजस्थानात आज रायझिंग राजस्थान वैश्विक गुंतवणूक परिषदेचं पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन
2. नौदलाच्या अत्याधुनिक तुशील युद्धनौकेच संरक्षणमंत्र्यांच्या हस्ते आज रशियाच्या यंत्रा बंदरात जलावतरण
3. महाराष्ट्राच्या विधानसभा अध्यक्षांची आज निवड, राहुल नार्वेकर बिनविरोध निवडून येणं निश्चित
4. सीरीयावर बंडखोरांचा ताबा, माजी राष्ट्राध्यक्ष असद यांनी घेतला मॉस्कोत आश्रय
5. श्रवणदोष असलेल्या भारतीय खेळाडूंची आशिया पॅसिफिक क्रीडा स्पर्धेत पाच सुवर्णपदकांसह प्रेरणादायी कामगिरी आणि
6. फिडे जागतिक अजिंक्यपद बुद्धिबळ स्पर्धेत भारताच्या डी. गुकेश याची 11 व्या फेरीत 6-5 अशी आघाडी,

**पंतप्रधान-राजस्थान**

राजस्थानच्या जयपूरमध्ये रायझिंग राजस्थान या वैश्विक गुंतवणूक परिषदेचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज होणार असून ते उद्घाटन सत्राला संबोधितही करतील. तसंच राजस्थान वैश्विक व्यापार प्रदर्शनाचं उद्घाटनही मोदी यांच्या हस्ते होणार आहे. तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेत, 32 राष्ट्रांच्या प्रतिनिधींसह, पाच हजाराहून अधिक व्यावसायिक, व्यापार प्रतिनिधी, राजदूत आणि गुंतवणूकदार सहभागी होणार आहेत. तर सतरा देश या परिषदेचे भागीदार आहेत. राज्यात गुंतवणुकीला चालना मिळावी म्हणून राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी ऊर्जा, एमएसएमई, पर्यटन तसंच खाणकाम यासंदर्भात नवीन 9 धोरणे लागू केली असून, या शिखर परिषदेला प्रारंभ होण्यापुर्वी गुंतवणुकीशी निगडीत तीस लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करारही करण्यात आले आहेत. पुढील पाच वर्षात राज्याची अर्थव्यवस्था साडेतीनशे अब्ज डॉलर्सपर्यंत नेण्याचं उद्दीष्ट राज्य सरकारनं ठेवलं आहे.

**राजनाथ-रशिया**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंग आज रशियाच्या कॅलिनीनग्राड इथल्या यंत्रा बंदरात भारतीय नौदलाच्या बहुपयोगी, क्षेपणास्त्र सज्ज, अत्याधुनिक आयएनएस तुशील या युद्धनौकेचं जलावतरण करणार आहेत. यावेळी नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी देखील उपस्थित असतील. संरक्षणमंत्री सिंग यांचं काल रात्री तीन दिवसांच्या रशियाच्या दौऱ्यावर आगमन झालं आहे. ते आज होणाऱ्या उभय देशांच्या लष्करी आणि लष्करी तांत्रिक सहकार्यावरील आंतर-सरकारी आयोगाच्या 21 व्या बैठकीचं रशियन समकक्ष आंद्रे बेलोसोव्ह यांच्यासमवेत सहअध्यक्षपद भूषवतील. औद्योगिक सहकार्यासह दोन्ही नेते उभय देशांच्या लष्करी, संरक्षण क्षेत्रातल्या बहुआयामी संबंधांचा आढावा घेतील. तसंच परस्पर हिताच्या समकालीन प्रादेशिक तसंच जागतिक मुद्द्यांवर वैचारिक देवाणघेवाण करतील. संरक्षण मंत्री यावेळी मॉस्कोमध्ये दुसऱ्या महायुद्धात वीरगती प्राप्त झालेल्या सोव्हिएत सैनिकांना द टॉम्ब ऑफ द अननोन या समाधीस्थळी श्रद्धांजली वाहातील. तसंच स्थानिक भारतीय समुदायाशीही संवाद साधतील.

**बीएसएफ**

सीमा सुरक्षा दलाच्या धैर्य, शौर्य आणि बलिदानाच्या बळावरच गेल्या सहा दशकांपासून देशाच्या सीमा सुरक्षित तसंच मजबूत राहात असल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल केलं. जोधपूर इथं सीमा सुरक्षा दलाच्या 60 व्या

स्थापना दिनाच्या निमित्तानं आयोजित समारंभात शहा बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारनं देशाच्या सीमा सुरक्षेचं धोरण स्पष्ट केल्यानं देशाच्या सीमांवरील पायाभूत सुविधा मजबूत करण्यावर भर देत त्यासाठी अर्थसंकल्पातही विशेष तरतूद केली आहे. तसंच सीमावर्ती भागातल्या नागरिकांना रोजगार, मूलभूत सुविधा, सन्मान मिळावा यासाठी, तीन हजार सीमावर्ती गावांमध्ये व्हायब्रंट व्हिलेज योजना सुरू केल्याची माहिती शहा यांनी यावेळी दिली. या समारंभात उत्कृष्ट सेवेबद्दल शौर्य पुरस्कार आणि पोलिस सेवा पुरस्कारांचं वितरणही शहा यांच्या हस्ते करण्यात आलं.

**<u>सीरीया-राष्ट्राध्यक्ष</u>**

सीरियामध्ये बंडखोरांनी राजधानी दमास्कसवर ताबा मिळवल्यानंतर, माजी राष्ट्राध्यक्ष बशर अल असद आणि त्यांच्या कुटुंबियांनी रशियात मॉस्कोमध्ये आश्रय घेतल्याच्या बातम्यांची क्रेमलिननं पुष्टी केली आहे. मानवताधारित दृष्टीकोनानं रशियानं असद यांना प्रवेशाची परवानगी दिली आहे. रशियाच्या युक्रेनवरील लष्करी हल्ल्याला असद यांनी पाठिंबा दर्शवला होता. दरम्यान, अबू- मोहम्मद अल जोलानी यांच्या नेतृत्वाखाली बंडखोरांनी अनेक वर्षांची असद यांची सत्ता उलथवून लावत संपूर्ण इस्लामिक राष्ट्रासाठी विजयाची घोषणा केली आहे. तर सीरियाचे माजी पंतप्रधान मोहम्मद गाझी अल जलाली यांनी मुक्त निवडणुका घेण्याचे आवाहन केलं आहे. सीरियाच्या राजकीय परिस्थितीच्या वेगवान घडामोडींमुळे स्थानिक स्थिरतेविषयी इतर अरब राष्ट्रांमध्ये चिंतेचं वातावरण आहे.

**<u>सीरिया परिस्थिती</u>**

सीरीयामध्ये परिस्थिती गंभीर झाली असली तरीही राजधानी दमास्कसमधील भारतीय दुतावासाचे कामकाज सुरू राहाणार आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दुतावास स्थानिक भारतीयांच्या संपर्कात असून ते सर्व सुरक्षित आहेत. भारतीयांच्या मदतीसाठी दुतावास उपलब्ध असेल असंही सांगितलं आहे.

**<u>जयशंकर</u>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी भारताची पश्चिम आशिया संदर्भातली सर्वसमावेशक रणनीती मनामा संवादात सादर केली. भारताच्या आर्थिक आणि सामरिक क्षेत्राच्या हितसंबंधांसाठी असलेल्या महत्त्वावर भर दिला. या संवादाच्या समारोपाच्या सत्रात बोलताना आखाती सहकार्य परिषद, इराण आणि इराक यांच्यासमवेत भारत वार्षिक 170 ते 180 डॉलर्सचा वार्षिक व्यापार करत असल्याचं सांगून भूमध्य सागरी राष्ट्रांशीही 80 ते 90 अब्ज डॉलर्सचा व्यापार करत असल्याचं स्पष्ट केलं.

**<u>गोयल नॉर्वे</u>**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी नॉर्वे आणि भारत यांच्यादरम्यान स्टार्टअप पूल सुरू करण्याचा प्रस्ताव दिला आहे. उभय देशांच्या व्यापार संबंधांना वृद्धिंगत करण्यासाठी संबंधित मंत्रालयांसमवेत समस्यांचे निराकरण करण्याप्रती वचनबद्ध असल्याचं गोयल यांनी सांगितलं. भारतीय उद्योग महासंघ, अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग यांच्या सहकार्यानं मुंबईत आयोजित भारत-नॉर्वे व्यावसायिक चर्चेला संबोधित करताना गोयल बोलत होते. नुकताच भारत आणि युरोपियन मुक्त व्यापार संघटना यांच्यात नुकताच व्यापार आणि आर्थिक भागीदारी करार करण्यात आला. त्यात युरोपिय महासंघातल्या स्वित्झर्लंड, आयर्लंड, नॉर्वे आणि लिंकटेस्टीन या विकसित राष्ट्रांचाही समावेश आहे.

**<u>परदेशी गुंतवणूक</u>**

डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात परदेशी गुंतवणूकीत 24 हजार कोटी रुपयांची भरीव वाढ झाली आहे. भारतीय रोखे बाजारात परदेशी गुंतवणूकदारांनी 24 हजार 454 कोटी रुपयांची गुंतवणूक केल्यांचं वित्तीय संस्थांनी दिलेल्या आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे. सप्टेंबरमध्ये परदेशी गुंतवणुकीचा उच्चांक गाठल्यानंतर ऑक्टोबर, नोव्हेंबरमध्ये परदेशी गुंतवणूकदारांनी पैसे काढण्याचा सपाटा लावला होता. डिसेंबरमध्ये मात्र आशादायक चित्र निर्माण झालं आहे.

**<u>महाराष्ट्र विधानसभा</u>**

महाराष्ट्राच्या 15 व्या विधानसभेच्या अध्यक्षांची निवड आज होणार आहे. भाजपाचे राहुल नार्वेकर यांचा एकमेव अर्ज अध्यक्षपदासाठी दाखल झाल्यामुळे त्यांची बिनविरोध निवड झाल्याचं अधिकृतरित्या जाहीर होणं अपेक्षित आहे. काल दुपारी 12 वाजेपर्यंत अध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत होती. परंतु मुदत संपेपर्यंत महाविकास आघाडीतर्फे कोणीही अर्ज भरला नाही. आज विधानसभेच्या विशेष अधिवेशनाचा अखेरचा दिवस असून हंगामी विधानसभा अध्यक्ष कालिदास कोळंबकर उर्वरित आमदारांना शपथ देतील. त्यानंतर अध्यक्षपदी राहुल नार्वेकर यांची निवड झाल्याचं अधिकृतपणे जाहीर होईल. आज विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचं अभिभाषण होणार आहे.

**<u>हॉकी</u>**

ओमानमध्ये मस्कत इथं सुरू असलेल्या महिलांच्या कनिष्ठ गट आशिया करंडक हॉकी स्पर्धेत काल भारतीय संघानं बांग्लादेशवर 13-1 असा दणदणीत विजय मिळवला. भारतातर्फे मुमताज खान हिनं 4 तर कनिका सिवाच आणि दीपिका यांनी प्रत्येकी 3 गोल केले. आज गट साखळीतला भारताचा दुसरा सामना मलेशियासोबत होणार आहे. ही स्पर्धा पुढच्या वर्षी चिली इथं होणाऱ्या कनिष्ठ गटाच्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठीची पात्रता फेरी आहे.

**<u>पॅसिफिक आशिया स्पर्धा</u>**

श्रवणदोष असलेल्या खेळाडूंच्या आशिया पॅसिफिक क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. मलेशियात क्वालालंपूर इथं पार पडलेल्या या स्पर्धेत भारताला 55 पदकं मिळाली. यामध्ये 8 सुवर्ण, 18 रौप्य आणि 29 कांस्य पदकांचा समावेश आहे. मैदानी स्पर्धांमध्ये भारतीय खेळाडूंनी पाच सुवर्ण पदकं पटकावली. केंद्रिय मंत्री मनसुख मांडवीय यांनी सर्व खेळाडूंचं अभिनंदन करुन च्याचं यश देशासाठी प्रेरणादायी असल्याचं म्हटलं आहे. या स्पर्धेत 62 पदकं मिळवत इराणनं सर्वसाधारण विजेतेपद पटकावलं.

**<u>बुद्धीबळ</u>**

फिडे जागतिक अजिंक्यपद बुद्धीबळ स्पर्धेत भारताच्या डी. गुकेश यानं 6-5 अशी आघाडी मिळवली आहे. सिंगापूरमध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेच्या 11 व्या फेरीत काल गुकेशनं गतविजेत्या डिंग लिरेनवर मात केली. या विजयामुळे गुकेशनं सामने बरोबरीत राहण्याची मालिका खंडीत केली असून त्याच्या जगज्जेतेपदाची शक्यता आणखी वाढली आहे. या स्पर्धेतल्या तीन फेऱ्या होणं बाकी आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार.